Studies in Indian Place Names (UGC Care Journal)
ISSN: 2394-3114 Vol-40 Special Issue-07
NAAC sponsored Two Day National Seminar on Role of HEIs in Tapping Local Resources for Quality Sustenance and Quality Enhancement
HELD on 14th & 15th February 2020.
Organized by: Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur, Maharashtra 441201. India

# गुणवत्तापूर्ण वाढीसाठी कौशल्य विकास शिक्षणाची आवश्यकता

डॉ. सुनिल शिंदे
*अर्थशास्त्र विभागप्रमुख*
*भिवापूर महाविद्यालय, भिवापूर*

- **प्रस्तावना**

वर्तमानकाळातील रोजगाराची समस्या विचारात घेता उच्च महाविद्यालयीन शिक्षणातून विद्याथ्र्यांला दिले जाणारे शिक्षण हे कुचकामी ठरतांना दिसत आहे. भारतामध्ये सध्या बेरोजगारीची समस्या अतिशय गंभिर असून विद्यापीठातून आणि महाविद्यालयामधून पारंपारीक पदवीचे शिक्षण घेणाऱ्या लाखो शिक्षित युवकांच्या बेरोजगारीची फौज निर्माण झाली आहे. भारताने 1991 मध्ये स्विकारलेल्या नविन आर्थिक धोरणामुळे जागतिकीकरणाला अनुसरून भारतामध्ये खाजगीकरणाचा वेगाने विस्तार होत असतांना सार्वजनिक क्षेत्रातील रोजगाराच्या संधी झपाटयाने कमी होत आहेत. अशातच सार्वजनिक क्षेत्रामध्ये नौकरी मिळेल या हेतुने पारंपारीक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यामध्ये नैराष्य निर्माण होत आहे. विषेषतः ग्रामीण भागामध्ये आजही पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये पारंपारीक कला आणि वाणिज्य या विषयाचे शिक्षण ग्रामिण शैक्षणिक संस्थामधून सुरू आहे. ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थी हे पारंपारीक शिक्षण घेऊन बेरोजगार होत आहेत. पदवी आणि पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण घेलेले कितीतरी लाखो विद्यार्थी घरी बसलेले आपल्याला बघावयास मिळतील. काळ झपाट्याने बदलत चाललेला आहे. खाजगी क्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी ह्या शिक्षणावर नाही तर शिक्षणातून विद्यार्थ्यानी प्राप्त केलेल्या कौशल्यावर आधारीत आहेत. शहरी भागामध्ये अनेक शैक्षणिक संस्थांनी खाजगीकरणाला अपेक्षित व्यावसायीक व कौशल्य निर्माण करणारे अभ्यासक्रम सुरू केलेले आहेत. परंतु आजही भारताच्या ग्रामीण भारतातील चित्र मात्र फारसे बदललेले नाही. आणि शैक्षणिक संस्था व शैक्षणिक संस्थाचे प्रमुख नव्या शैक्षणिक बदलत्या प्रवाहाला अनुसरून कार्य करतांना दिसून येत नाही. पारंपारीक अभ्यासक्रम चालवीणे आणि सरकारकडून मिळणारे करोडो रूपयाचे अनुदान प्राप्त करणे हिच शिक्षण आणि विद्यार्थ्या प्रती आपली जबाबदारी समजतात. त्यामुळे काळाची पाऊले ओळखुन आणि विद्यार्थी व समाजाप्रती असलेले आपले उत्तरदायीत्व समजून उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्याना पारंपारीक अभ्यासक्रमासोबतच व्यावसायीक कौशल्य अभ्यासक्रमाला प्राधान्य दिले पाहिजे. पारंपारीक अभ्यासक्रमासोबतच दैनंदीन जीवनामध्ये उपयुक्त पडू शकणारे विद्यार्थ्यामध्ये कौशल्य निर्माण करणारे प्रशिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे.

- **शिक्षण आणि कौशल्य विकास**

Studies in Indian Place Names (UGC Care Journal)
ISSN: 2394-3114 Vol-40 Special Issue-07
NAAC sponsored Two Day National Seminar on Role of HEIs in Tapping Local Resources for Quality Sustenance and Quality Enhancement
HELD on 14th & 15th February 2020.
Organized by: Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur, Maharashtra 441201, India

आजच्या जीवनामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कतिक परिस्थितीमध्ये वेगाने बदल होत आहे. ह्या बदलामुळे विद्यार्थी गोंधळून गेलेला आहे. पालकांच्या आणि शिक्षकांच्या मोठ्या अपेक्षांच्या ओझ्याखाली विद्यार्थी दडपल्या गेला आहे. त्यामुळे स्वत:ला समजून घेण्याची क्षमता विकसित होण्यास त्यास अडसर निर्माण होत आहे. विद्यार्थ्याचा सर्वागिण विकास करणे हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट मानले जाते. त्या सर्वागिण विकासामध्ये मानसिक व बौध्दिक क्षमतांचा जास्तीतजास्त उपयोग करून शिक्षण अधिकाधिक कौश केंद्रीत करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधता येतो. विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकासासाठी विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांनाच त्याच्यामध्ये विविध प्रकारच्या कौश गुणांचा विकास होणे आवण्यक आहे. यासाठी शिक्षण आणि कौशल्य यांचा मेळ घालणे अतिशय आवश्यक आहे.

- **कौशल्य विकास शिक्षणाची आवश्यकता**

भारतीय अर्थव्यवस्था काहीशा अस्थिर पायावर टिकून आहे असे वाटते. वाटती बेरोजगारी. जागतिक स्पर्धा. औद्योगिक मंदी. पाणी आणि शेतीबाबत साशंक वाटचाल अशा अनेक समस्या भारतीय अर्थव्यवस्थेपुढे आहेत. महाराष्ट्रातील परिस्थितीही जवळपास तशीच आहे. जर हा अस्थिर पाया मजबूत करायचा असेल तर शिक्षण आणि कौशल्य विकासावर भर देण्याची वेळ आली आहे. जर उत्तम शिक्षण आणि कौशल्य विकासांनी भरपूर अशी तरुण-तरुणींची नवीन पिढी तयार झाली तर त्यामुळे देशातील सामाजिक तसेच आर्थिक वातावरण बदलेल. जे विद्यार्थी कौशल्य ज्ञानावर आधारित असलेले अभ्यासक्रम निवडतात. त्यांना अभ्यासक्रमाविषयी संपूर्ण माहिती असते. शिवाय रोजगाराच्या ठिकाणी त्यांच्याकडून काय विशिष्ट अपेक्षा व गरजा आहेत. या विषयी त्यांना सखोल ज्ञान असते. संपूर्ण अभ्यासक्रमाच्या कालावधीत ज्ञान, विविध कौशल्ये आणि स्पर्धात्मक गुणवत्ता विद्यार्थ्यांच्या अंगी बाणवली जाते. कौशल्य ज्ञान अभ्यासक्रमात अंतर्गत गुणवत्ता रोजगाराच्या ठिकाणी सातत्याने ओळख, उद्योगक्षेत्रातील मान्यवरांचे मार्गदर्शन, प्रात्यक्षिके या सर्व गोष्टींचा समावेश केलेला असतो. त्यामुळे कौशल्यज्ञान शिक्षण घेतलेले विद्यार्थी त्यांच्या समकक्ष विद्यार्थ्यापेक्षा अधिक उत्तम व चांगल्याप्रकारे तयार झालेले असतात. अशा विद्यार्थ्यांना रोजगाराच्या ठिकाणी किंवा उद्योगक्षेत्रात वेळोवेळी अनुभव मिळाला असल्याने रोजगाराच्या संधी अधिक उपलब्ध असतात. पदवी होऊन बेरोजगार होण्याऐवजी एखादा कौशल्य अभ्यासक्रम पूर्ण करणे योग्य ठरणार आहे. कौशल्य प्रशिक्षण घेतल्यास भविष्यात स्वत:च्या पायावर निर्भरपणे उभे राहता येईल. यातून सर्वाना रोजगाराची संधी मिळेल,

- **कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व**

प्रचलित शिक्षण पध्दतीमध्ये अनेक दोश असून या शिक्षण पध्दतीने कौशल्य आत्मसात नसलेल्या सुशिक्षित तरून युवकांची फौज निर्माण केली आहे. आज सुशिक्षित तरूणामध्ये असलेली बेकारीची समस्या अतिषय तिव्र असून विद्यापीठ आणि महाविद्यालयाद्वारे शिकविले जाणारे अभ्यसक्रम निरूपयुक्त ठरत आहे.

Studies in Indian Place Names (UGC Care Journal)
ISSN: 2394-3114 Vol-40 Special Issue-07
NAAC sponsored Two Day National Seminar on Role of HEIs in Tapping Local Resources for Quality Sustenance and Quality Enhancement
HELD on 14th & 15th February 2020.
Organized by: Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur, Maharashtra 441201, India

त्यामुळे विद्यापीठ व महाविद्यालयांनी विद्याथ्र्यासाठी अभ्यासक्रम तयार करतांना सध्याच्या काळात उपलब्ध असलेले रोजगार व भविष्यकाळात विविध उद्योग व व्यवसायात निर्माण होणा-या रोजगाराच्या संधी याचा वेध घेऊन अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. महाविद्यालयाने विविध कंपन्याशी करार करून कंपन्यांना पाहिजे असलेले कौशल्य विद्याथ्र्यामध्ये निर्माण करणे गरजेचे झाले आहे.

- **कौशल्य विकसित करण्यासाठी आवश्यक बाबी**

शिक्षणाचा विचार करताना प्रत्येक व्यक्तीची प्रकृतीची जडणघडण आजूबाजूचे वातावरण याचा विचार केला पाहिजेण् प्रत्येक व्यक्तीची क्षमता वेगवेगळी असतेण् एखाद्या विद्यार्थ्याला शारीरिक खेळामध्ये रस असतो. एखाद्याला गाण्याची आवड असते. एखादा चांगला वक्ता असतोण ही कौशल्ये प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये वेगवेगळी असतात. विद्यार्थ्याला शिकवताना त्याच्यामधील ही कौशल्ये ओळखून त्याचा विकास घडवून आणून त्याची गुणवत्ता समाजाभिमुख करणे हा शिक्षणाचा मूळ उद्देश हवा.

1. विद्यार्थ्यामध्ये कौशल्य विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यामधिल कौशल्याचा शोध घेण्यासाठी पध्दती विकसित करणे.

2. विद्यार्थ्यामधिल कौशल्य ओळखुन त्यांचा विकास करण्यासाठी शिक्षकांनी प्रबोधन व मार्गदर्शन् करून त्यांना प्रशिक्षित करणे.

3. कौशल्य विकसित करण्यासाठी शैक्षणिक उपक्रम तयार करावयास हवा.

4. कौशल्याचे मुल्यमापन कसे करावे या विषयीची कार्यपध्दती तयार करायला हवी.

5. कौशल्य प्राप्त करून ती विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना कोणत्या पध्दतीचे शिक्षण द्यावे. अभ्यासक्रमात कोणते विषय असावेत याचा विचार करायला हवा.

6. कौशल्यानुसार अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्या विषयात पारंगत झाल्यावर विद्यार्थ्याला रोजगाराची संधी उपलब्ध व्हायला हवी.

संदर्भसुची

1. जीवन कौशल्य शिक्षक, शिक्षण मार्गदर्शिका अध्ययन, अध्यापन पध्दती आणि मुल्यमापन भाग-2 महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संषोधन व प्रशिक्षण मंडळ, पुणे-30
2. भोसले र.अ. डोण उ.म. (2009) षिक्षणातील बदलते विचार प्रवाह, फडके प्रकाशन
3. मोरे के.आर. शिक्षण समिक्षा, पिंपळापुरे अॅन्ड पब्लिकेशन्स, नागपूर
4. लोकमत, सकाळ, महाराष्ट्र टाईम्स दैनिक वर्तमानपत्रे